सोमवार, २९ ऑगस्ट २००५ ■ महाराष्ट्र टाइम्स

# होमिओपथी वाचवण्यासाठी मुंबईतले डॉक्टर सरसावले

**विलास आठवले**

मेडिकल क्षेत्रात अॅलोपथी आयुर्वेद आणि होमिओपथी यापैकी कोण श्रेष्ठ आहे, हा वाद नेहमीच सुरू असतो. पण लंडनच्या लॅन्सेट या संस्थेने होमिओपथीवर टीकास्त्र सोडून नवं वादळ निर्माण केलं आहे. त्यामुळेच आता भारतीय डॉक्टरांनी होमिओपथीला वाचवण्यासाठी एकत्र यायचं ठरवलंय.

होमिओपथी हे केवळ डमी ड्रग उरलं असल्याचा निष्कर्ष लॅन्सेटने काढला होता. जागतिक पातळीवर होमिओपथी उपचारांसाठी मागणी असल्याने अॅलोपथीतील औषध कंपन्यांनी ही आघाडी उघडली का, अशी शंका व्यक्त केली जात आहे.

होमिओपथीही आपल्या जागी श्रेष्ठ आहे, इतकंच नव्हे तर अत्यंत दुर्धर रोगांवरही ते रामबाण औषध आहे, असा विश्वास डॉ. प्रफुल्ल विजयकर यांनी व्यक्त केला आहे. विजयकर गेल्या तीस वर्षांपासून प्रेडिक्टिव होमिओपथीवर रिसर्च करत आहेत. अॅलोपथी डॉक्टरांनी आशा सोडून दिलेल्या अनेक केसेस होमिओपथीने बऱ्या झाल्याचं त्यांनी सांगितलं.

चेंबूर इथे प्रॅक्टिस करणाऱ्या डॉ. अनिता साळुंखे यांनी लंडन इथे करण्यात आलेल्या सर्वेवर शंका व्यक्त करून अॅलोपथी बरोबर होमिओपथीही गुणकारी असल्याचा दावा केला. विदेशी कंपन्या काही संस्थांना हाताशी धरून होमिओपथीबाबत अपप्रचार करत असल्याचंही त्या म्हणाल्या, होमिओपथीमुळे रुग्णांना मोठ्या प्रमाणावर फायदा होत असल्याचं त्यांनी सांगितलं.

दिल्लीत प्रॅक्टिस करणारे डॉ. कमल मलिक यांच्याकडेही होमिओपथीच्या उपचारासाठी रुग्णांची गर्दी असते. समजा रुग्णांना काही फायदाच होत नसेल तर ते गर्दी. कशाला करतील असा होमिओपथी डॉक्टरांचा सवाल आहे. पंजाब, हरयाणा, चंदिगड या उत्तरेकडील राज्यात होमिओपॅथी उपचारांमुळे रुग्णांची आयुष्य बदललं आहे, याचा फायदा इथल्या डॉक्टरांनाही झालाय रुग्णांच्या प्रतीक्षेत बसणाऱ्या डॉक्टरांकडे प्रेडिक्टिव होमिओपथीमुळे गर्दी दिसू लागली असल्याचं डॉ. मावी यांनी सांगितलं.

उद्योग, सिनेमा आणि क्रीडा क्षेत्रातली बडी मंडळीही होमिओ-पथीच्या उपचारावर अवलंबून आहेत. त्यामुळे कुणी टीका केल्याने होमिओपथीचं महत्त्व कमी होत नाही, असं डॉ. अंबरिश विजयकर यांनी सांगितलं. नुकत्याच सुरू झालेल्या वादाने होमिओपथीबाबत आणखी जनजागृती होण्यास मदत होईल, असं ते म्हणाले.

लंडन इथे सुरू झालेल्या वादाबाबत होमिओपथीचे डॉक्टर मुंबईत जनजागृती मोहीम सुरू करत आहेत, अशी माहिती डॉ. अंबरिश यांनी दिली. येत्या महिन्यात मुंबईच्या अनेक भागात प्रेडिक्टिव होमिओपथीचे कार्यक्रम राबवले जातील, असं ते म्हणाले.

mumbaitimes@indiatimes.com